१.८

५८१५२


दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

जा.क्र.माअधि/अपिल/३९/२०१९
दि.१५/०४/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.राजीव त्रिंबक देशपांडे, ................अपिलार्थी
बी-१५, नूतन निवास,
वीर सावरकर नगर, वसई रोड,
वसई (प.) ४०१२०२.

O/C

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

## -: विवेचन :-

श्री.राजीव त्रिंबक देशपांडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.१४/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

विषय:- मालमत्ता क्र.एफ०२००१२७१४०००, एफ०२००१२७३२०००, एफ०२००३४४४६०००, एफ०२००३६१०५०००, एफ०२००३६२२०००० बाबत.

**अ)** वरील विषयांकीत सर्व मालमत्तांच्या कर आकारणीसाठी महापालिका कार्यालयास प्राप्त मागणी अर्जासह सर्व दस्तऐवजांची पडताळणी (सर्च) देवून पसंतीनुरुप साक्षांकीत प्रती पुरविणे.

**ब)** वरील विषयांकीत सर्व मालमत्ता क्रमांकांच्या मालमत्ता आकारणी पत्रासह (ॲसेसमेंट) देयकांच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.

**क)** वरील विषयांकीत सर्व मालमत्ता क्रमांकांच्या मालमत्तांना कर आकारणी करणाऱ्या मालमत्ता कर विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे, पदनाम, कार्यरत विभाग, कर्तव्ये, जबाबदाऱ्यांबाबत साक्षांकीत माहिती पुरविणे.

**ड)** वरील विषयांकीत मालमत्तांच्या कर आकारणीसाठी मागणी सह केलेल्या कारवाईबाबत पालिका आवक-जावक रजिस्टर मधील नोंदीच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत मुद्दा क्र.अ,क व ड या मुद्द्यांची माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.२८/०३/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

Scanned by CamScanner

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१२/०४/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/५३/२०१९ दि.०४/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ कामी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.१५/०४/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/६५/२०१९ दि.११/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१४/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार मुद्दा क्र.अ, क, व ड च्या मुद्द्यांची माहिती दिली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्दा क्र.अ, क व ड ची माहिती ७ दिवसांत विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.राजीव त्रिंबक देशपांडे,
बी-१५, नूतन निवास,
वीर सावरकर नगर, वसई रोड,
वसई (प.) ४०१२०२.

Scanned by CamScanner

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) सहा.जनमाहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.४

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner